# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २८/०३/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## हद्दपार इसमास पुन्हा नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले जेरबंद

दिनांक २५/०३/२०२४ चे ११.०० वा. दरम्यान पोस्टे मौदा येथील स्टाफ पोस्टे मौदा हद्दीत स्टाफसह धुलिवंदन निमीत्त पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, नागपूर जिल्हयातून हद्दपार करण्यात आलेला आरोपी नामे—विलास सुर्यभान वासनिक, रा. दहाडी, ता. मौदा हा मा. उपविभागीय दंडाधिकारी सा. मौदा यांचे आदेशाचे उल्लंघन करून स्वत:चे घरी दहाडी येथे आलेला आहे. यावरून नमुद आरोपीचे घराची घरझडती घेतली असता आरोपी विलास सुर्यभान वासनिक वय ४४ वर्ष,रा. दहाडी ता. मौदा हा घरी हजर मिळुन आल्याने त्याचेविरूद्ध कलम १४२ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये पोस्टे मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतिशसिंग राजपूत,पोलीस उपनिरीक्षक महेश बोथले, पोहवा संदीप कडु, गणेश मुदमाळी रूपेश महादुले, पोना दीपक दरोडे, पोलीस अंमलदार अतिश गाढवे यांनी पार पाडली.

## बकरी चोरी करणारा आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

फिर्यादी नामे— अशोक पंजाबराव ठाकरे, रा. कोदेगाव वार्ड क्र. ०२ सावनेर यांनी पोस्टे खापा ला तोंडी रिपोर्ट दिली कि, दिनांक १६/०१/२०२४ रोजी सकाळी ०५.०० वा. दरम्यान गोठयात ठेवलेल्या एकुण १५ बकऱ्या कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे. अशा रिपोर्ट वरून पोस्टे खापा येथे अप. क्रमांक २४/२०२४ कलम ४५७, ३८० भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयामधील अज्ञात आरोपीचा शोध घेत असता मिळालेल्या गोपनीय बातमीदार, तांत्रिक माहितीच्या आधारे सदर गुन्हयातील आरोपी यासकोदेगाव परीसरात ॲटो क्र. एम.एच—४९/ए.आर—००१७ नेसंजय बाग कॉलनी विनोबा भावे नगर, नागपूरयेथे जातांना पकडले. त्यास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्याचे नाव**रहमान सत्तार शेख वय ३२ वर्ष रा. विनोबा भावे नगर संजय बाग कॉलोनी गांधी पुतळा नागपूर**असे सांगितले.सदर आरोपीस ताब्यात घेवुन सदर बकरी चोरीच्या गुन्हयाबाबत विचारपुस केली असता उडवाउडवीचे उत्तरे दिली. आरोपीची कसोशीने विचारपुस केली असता आरोपीने सदर चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातून गुन्हयात वापरलेला ॲटो क्र.एम. एच—४९/ए.आर—००१७ किंमती ७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि सुनिल दहीभाते, पोउपनि मिलींद गेडाम, सफौ नारायण बोरकर, पोशि राहुल रेवतकर, पन्नालाल बटाउवाले यांनी कारवाई केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर